# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०७
# सभा क्र.०८, दिनांक १७/०५/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. १७/०५/२०२४ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | प्रभारी नगरसचिव |
| मा. अनिरुध्द पावसकर | – | मुख्य अभियंता (पथ) |
| मा. सौ. प्रतिभा पाटील | – | उपायुक्त, मालमत्ता व्यवस्थापन/सेवकवर्ग |
| मा. संजय शिंदे, | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. ३ |
| मा. संदीप कदम | – | उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन |
| मा. नितीन उदास | – | उपायुक्त, समाजविकास विभाग |
| मा. सुनिल मते | – | सहा. महा.आयुक्त (क.आ.क.सं. विभाग) |

## कार्यपत्रिकेवरील विषय

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ४३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी सहकारनगर, व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र.उआप-३/४८५,दि.१०/०५/२०२४ चे पत्र

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.४४**

पुणे शहरातील हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाउस, सर्विस अपार्टमेंट कर आकारणी बाबत खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/१०३४, दि.१३/१२/२०२३ चे पत्र.

१) पुणे शहरातील खासगी मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या बिगरनिवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३२ चे तरतुदीस अधीन राहून शासन मान्यताप्राप्त तसेच धर्मदाय नोंदणीकृत शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था यांचे मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या निवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यांनी करण्यात यावा, असे दि.१५/०३/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.४५**

साधू वासवानी पुल (कोरेगाव पार्क) ते बंडगार्डन पुलापर्यंत एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करणे या कामांतर्गत पाण्याची लाईन स्थलांतरीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदारमे.R.B. Krishnaniयांचेटेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडरर.रु.३,०७,७९,९०१/- पेक्षा ०.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,०७,४९,१२१=१ अधिक जीएसटी र.रु.५५,३४,८४२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,७९,४७९/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३,६४,६३,४४२=१ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.०) पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात

करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१७६९, दि.०५/०३/२०२४ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यांनी करण्यात यावा, असे दि.१५/०३/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

सही /– XXX
**(योगिता भोसले)**
**प्र. नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. ११/०६/२०२४ रोजी वृत्तांत मंजूर.**

सही /– XXX
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**